ल.पा.योजना हरीपुरा ता.यावल जि.जळगांव या योजनेस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांकः सुप्रमा -२०१८/(७५/२०१८)/ ल.पा.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २१ सप्टेंबर, २०१९

वाचा :

१) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचे जाक्र..तापाविम/प्रशा-५/४९५/सन २०१८ दि.२२/०१/२०१८ चे पत्र.

२) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचे जाक्र..तापाविम/प्रशा-५/४५/सन २०१८ दि.०१/०१/२०१९ चे पत्र.

३) वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांचे पत्र क्र.व्यअस- २०१९/प्र.क्र.४१/अर्थसं-२, दिनांक २१/०९/२०१९

प्रस्तावना :

ल.पा.योजना हरीपुरा ता.यावल जि.जळगांव या योजनेस तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा शासन निर्णय क्र.लपायो/१६९३/६४५/९३/खारभुमी,दि.२८/०३/१९९४ अन्वये एकूण रु.५.२८ कोटी (दरसूची सन १९९२-९३) इतक्या किंमतीस मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. शासन निर्णय क्र.लपायो/२०००/२०८/खारभुमी,दि.०१/०८/२००० अन्वये एकूण रु.१२.७४ कोटी (दरसूची सन १९९९-२०००) इतक्या किंमतीस प्रथम प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. व शासन निर्णय क्र.लपायो/२००८/१३२८/(४५५/२००८)/ खारभुमी,दि.१८/०२/२००९ अन्वये एकूण रु.२०.९० कोटी (दरसूची सन २००८-०९) इतक्या किंमतीस व्दितीय प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पाचे काम सुरु असतांना दरसूचीतील दरातील वाढ व भाववाढीमुळे वाढ़, भुसंपादनातील वाढ़, संकल्पचित्र बदलामुळे झालेली वाढ, नवीन तरतुदीमुळे झालेली वाढ़, अपुरे सर्वेक्षण व अपुऱ्या तरतुदींमुळे वाढ, इतर कारणांमुळे झालेली वाढ व अनुषंगिक खर्चामुळे झालेली वाढ या कारणांमुळे वाढ होत असल्यामुळे या योजनेस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे. तरी याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :

संदर्भ क्र१. व २ च्या पत्रान्वये तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांनी सादर केलेल्या ल.पा.योजना हरीपुरा ता.यावल जि.जळगांव या योजनेस सन २०१६-२०१७ च्या दरसूचीवर आधारित एकूण रुपये ८३.२४ कोटी (अक्षरी रुपये त्र्याऐंशी कोटी चोवीस लाख फक्त) या किंमतीस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. उपशिर्षवार तरतुदीचा गोषवारा सोबतच्या परिशिष्टामध्ये जोडला आहे.

२. सदर सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२.१) लगतपूर्व प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीपेक्षा अधिक खर्च शासन मान्यतेविना केला असल्यास प्रथमत: जबाबदारी निश्चित करुन खर्च नियमित करण्याची कार्यवाही करावी.

२.२) प्रकल्पाची अंमलबजावणी करतांना प्रचलित शासन निर्णय,नियम, CVC तत्वे, वित्तीय मर्यादा, विहित निविदा कार्यपद्धती अनुसरणे याचे अनुपालन करावे.

२.३) या प्रकल्पासंदर्भात आधीच्या कालावधीत कोणतीही आर्थिक वा कार्यपध्दतीत अनियमितता झाली असल्यास ती या मान्यतेने नियमित झाली असे म्हणता येणार नाही.

२.४) सदर सुधारित प्रशासकीय मान्यतेमुळे अहवालातील तांत्रिक बाबी, निविदा विषयक क्षेत्रिय निर्णय किंवा अनियमितता या निर्णयाव्दारे नियमित केल्या आहेत, असे नव्हे.

२.५) सदर योजनेसाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन, अतिरिक्त खर्च करता येणार नाही.

२.६) या योजनेबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशीची कार्यवाही पुढे चालू राहील. सदर सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

३. या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय-५ प्रधान लेखाशिर्ष, "४७०२ लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च, (८०) सर्वसाधारण, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना गुंतवणूका (००), (००)(०३) तापी पाटबंधारे विकास महामंडळास भागभांडवली अंशदान,(लहान पाटबंधारे) (कार्यक्रम), ५४-गुंतवणुका (४७०२ ४९२७)" या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व शासनाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय, नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१०७/का.१४३४ दि. २१/०८/२०१९ आणि वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.२१९/व्यय १२, दि.२८/०८/२०१९ अन्वये तसेच व्यय अग्रक्रम समीतीने दि.०३/०९/२०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत दिलेल्या मंजूरीनुसार व संदर्भ क्र.३ नुसार याबाबतच्या निर्गमीत केलेल्या इतिवृत्तानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

५. या योजनेस प्रदान केलेली तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता लपा कार्यासनाच्या प्रशासकिय मान्यता नोंदवहीत अ.क्र. (१९९/२०१९) वर नोंदविण्यांत आलेली आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२११८०१४४८२२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42153c779eba7d6ca17364b6d37857b105b20a01d36c767c7ed1d7d278837bd7, serialNumber=8a9bdce987e31fe4e079969a0eb71bce94df0f9984bd752cc203bcd86349bbb5, cn=Dharane Mallikarjun Irappa
Date: 2019.09.23 17:58:17 +05'30'

(म. ई. धरणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
३. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य., मुंबई.
४. विरोधी पक्ष नेते विधान परिषद / विधानसभा.
५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
६. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
७. वित्त विभाग (व्यय-१२), मंत्रालय, मुंबई ३२
८. नियोजन विभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई ३२.
९. कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव
१०. मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव.
११. आंतर वित्त सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. जिल्हाधिकारी, जळगाव.
१३. अधीक्षक अभियंता, जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ,जळगाव.
१४. अर्थशाखा १/२ (२ प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१६. लपा कार्यासन संग्रहार्थ.

परिशिष्ट

सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित किंमतीचा उपशीर्षनिहाय तरतुदीचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

ल. पा. योजना हरीपुरा, ता.यावल, जि.जळगाव,
शासन निर्णय क्रमांक :- सुप्रमा - २०१८/(७५/२०१८) लपा, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- २१ सप्टेंबर, २०१९

(रु. कोटी)

अ.क्र रर.	उपशिर्ष	तृतीय सुधारित प्रशासकिय मान्यतेनुसार तरतुद (दरसूची २०१६-१७)
१	अ - प्राथमिक	०.३७
२	ब - भू संपादन	३.०४
३	सी-मुख्य कामे	६२.७०
४	डी-विमोचक	२.०९
५	ई-प्रपात	०.००
६	एफ-आएचटी वर्क	०.००
७	जी-पुल	०.००
८	एच-ओलांडे	०.००
९	के-इमारत	०.०७
१०	एल-मातीकाम	०.००
११	एम-व्रुक्षारोपण	०.०३
१२	ओ-संकिर्ण	०.३३
१३	पी-देखभाल	०.१३
१४	आर-दळणवळण	१.५३
१५	कालवा व वितरण व्यवस्था (PDN)	५.६६
१६	अनुषंगिक खर्च	७.२९
	एकूण किंमत	**८३.२४**